ठाणे महानगरपालिका,ठाणे

संचालित

# चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्मधिकारी ग्रंथालय इमारत, तळ मजला, वेदांत शॉपींग कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) ४०० ६०६. दुरध्वनी ०२२-२५८८१४२१

---

## स्पर्धा परीक्षा पुर्वतयारी मार्गदर्शन वर्ग- २०२२ (Foundation Course)

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना निःशुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. तसेच, अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे.

स्पर्धा परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या आणि उच्च माध्यमिक परीक्षा व पदविका परीक्षा उत्तीर्ण होऊन सध्या पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या अथवा दुसऱ्या वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांसाठी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतर्फे एक स्पर्धा परीक्षा पुर्वतयारी मार्गदर्शन वर्ग (Foundation Course) चालवला जातो, या वर्गात प्रवेश घेणेकरीता उच्च माध्यमिक परीक्षेत विज्ञान, वाणिज्य, कला शाखेत व पदविका परीक्षेत ( Diploma Course ) ७० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. अशा इच्छुक विद्यार्थ्यांनी दिनांक ०४/०७/२०२२ ते २९/०७/२०२२ पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या कार्यालयीन वेळेत उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला (स्कूल लिव्हिंग सर्टिफिकेट) आणि स्टॅम्प साईज छायाचित्राच्या दोन प्रतींसह संस्थेकडील उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. टपालद्वारे, कुरिअरद्वारे, तसेच ई-मेल द्वारे प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत.

सदर प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती व सूचना संस्थेच्या नोटीस बोर्डावर तसेच ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in व संस्थेच्या www.cdinstitute.net किंवा www.cdinstitute.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

( महादेव जगताप )

संचालक

चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था

ठामपा,ठाणे.